निशाणी क्र.३९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देते की,

माझे नावः – कडूबाई पोपट खरात,

वय – ५० वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – यशवंतनगर, सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. पी औताडे यांचे मार्फत सुरू–**

१. आरोपी माझे शेजारी असल्याने मी त्यांना ओळखते. फिर्यादी माझे पती आहेत. घटना साधारण चार वर्षांपुर्वी दुपारी आमच्या घरासमोर घडली होती. घटनेच्या वेळी आरोपीसोबत आमचा किरकोळ वाद झाला होता. याव्यतिरीक्त काही घडले नाही. असे काही घडले नाही की, आरोपी क्र. १ याने माझ्या पतीला लाकडी दांडयाने मारहाण केली व आरोपी क्र. ४ ने मला चापटीने व इतर आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण केली होती व जीवे मारण्याची धमकी दिली.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.०६.२०२३ रोजी घटना माझ्या घरासमोर घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे पती घरामध्ये झोपलेले होते व मी घरासमोर भांडी घासत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ हा मला तुमचा सर्व पसारा रस्त्यावर असतो त्यामुळे आम्हाला जाण्यायेण्यास अडचण होते असे म्हणाला. हे म्हणणे खरे नाही की, त्याने मला वाईट शिविगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या शिविगाळ करण्याचा आवाज ऐकूण माझे पती घराबाहेर आले. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती आरोपी क्र. १ याला समजावून सांगत असतांना त्याला राग आला व त्याने त्याच्या हातातील लाकडी दांड्याने माझ्या पतीच्या उजव्या हातावर मारून दुखापत केली. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ते ४ तेथे आले व त्यांनी माझ्या पतीला लाथाबुक्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पतीला सोडवण्यासाठी गेले असता आरोपी क्र. ४ याने मला चापटीने मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या पतीने पोलीसात फिर्याद दाखल केली व त्याकामी नोंदवलेल्या जबाबामध्ये मी वरीलप्रमाणे अधोरेखांकित भाग–अ सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला आहे. सदरचा मजकूर माझ्या जबाबामध्ये का लिहिला याचे कारण मी सांगू शकत नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आमच्यात आपसात तडजोड झालेली असून आम्ही वाद मिटवला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे ॲड. ई. जी. देशमुख यांनी नाकारला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**

**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–०४/०३/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा.